विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७,डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे – ४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७
ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail .com वेब साईट- www.dydepune .com

जाक्र./प्रशिक्षण-५/डीटीएड-शासकीय प्रवेश/११-१२/२९५८३-८६ दिनांक-
21 JUL 2012

प्रति,

प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
लोणीकाळभोर, ता.हवेली,जि.पुणे/संगमनेर-अहमदनगर
/वेळापूर-ता.माळशिरस,जि.सोलापूर.

विषय- सन-२०११-१२ मधील अध्यापक विदयालयातील शासकीय कोटयातील प्रवेश मान्यतेबाबत

संदर्भ- १. शासनाकडील पत्र क्र.टिसीएम-२०१२/(१३/१२)/माशि-४,दि.१९.७.२०१२ चे पत्र.
२.मा.संचालक, मराशैसंप्रप,पुणे यांचेकडील पत्र क्र.मराशैसंप्रप/डी.टी.एड./प्रवेश कक्ष २०११-१२/२१९४ दि.२१.७.२०१२ चे पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, **डी.टी.एड. प्रथम वर्ष सन-२०११-१२** मध्ये शासकीय व व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागी अध्यापक विदयालयांनी त्यांचे स्तरावर तात्पुरते प्रवेश केलेले आहेत. सदरचे प्रवेश नियमित करणेबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथील याचिका क्र. ७३२/२०१२ मध्ये दि. २०.६.२०१२ दिलेल्या निकालामध्ये तात्पुरते प्रवेश नियमित करण्याबाबत मा.न्यायालयाने आदेश दिले आहेत. सदर आदेश विचारात घेवून सन-२०११-१२ च्या डी.टी.एड.प्रवेश प्रक्रीयेतील प्रथम वर्षातील जे विदयार्थी **एन.सी.टी.ई. अधिनियम १९९३ मधील तरतूदीनुसार २०० कार्यदिन** पूर्ण करीत आहेत, अशा विदयार्थ्याचे व्यवस्थापनांनी दिलेले तात्पुरते प्रवेश नियमित करण्यास शासनाने संदर्भिय पत्रान्वये मान्यता दिली आहे.

तरी आपले जिल्हयातील ज्या अध्यापक विदयालय,व्यवस्थापनाने शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये डी.टी.एड.प्रथम वर्षात रिक्त जागेवर प्रवेश दिले आहेत, अशा अध्यायपक विदयालयांचे प्राचार्य, तसेच संस्थेचे सचिव, व संस्थापक यांना खालील कागदपत्रांच्या पूर्ततेसह सदर प्रवेश मान्यतेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास **दि.३०.७.२०१२** अखेर सादर करणे बाबत सूचना आपल्या स्तरावरुन देणेत याव्यात. तसेच आपण डी.टी.एड.५० ची माहिती, परीक्षा परिषदेस सादर करतांना सदर विदयार्थ्यांचे २०० कार्यदिन पूर्ण होत असल्याची खात्री करुनच माहिती दि. ३०.७.२०१२ पर्यंत परीक्षा परिषदेस स्वतंत्रपणे पाठवावी.

१. **सोबतच्या विवरण पत्रानुसार प्रवेशित विदयार्थ्यांची यादी ३ प्रतीमध्ये सादर करण्यात यावी.**
२. यादीनुसार विदयार्थ्यांचे इ.१२ वी गुणपत्रक. २. विदयार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला/ किंवा टी.सी.
३. मागास संवर्गातील (कॅटेगिरी) विदयार्थ्याबाबत जातीचे प्रमाणपत्र.
४. मागास संवर्गातील विदयार्थ्यांचे प्रवेश मान्य झाल्यावर त्यांचे नॉनक्रिमीलेअर व जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अध्यापक विदयालयांच्या प्राचार्यांची राहील.
५. **एनसीटीई अधिनियम १९९३ मधील तरतूदीनुसार प्रवेशित विदयार्थ्यांचे २०० कार्यदिन पूर्ण केल्याचे रु.१००/- स्टॅम्प पेपरवर लेखी हमी पत्र प्राचार्य यांच्याकडून घेणे बंधनकारक आहे.**

(बी.डी.फडतरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर-
: मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिवपेठ, कुमठेकर मार्ग, पुणे-३०.

## विवरण पत्र

शासन पत्र क्र.टीसीएम-२०१२/(१३/१२)/माशि-४ दि.१९.७.२०१२ अन्वये शासकीय कोटयातील रिक्त जागी अध्यापक विदयालयाने दिलेल्या प्रवेशांची मान्यता यादी.

अध्यापक विदयालयाचे नांव व पत्ता -------------------------------------------
-------------------------------------------

विदयार्थ्यांना दिलेल्या प्रवेशाचा दिनांक ---------

| अक्र. | विदयार्थ्यांचे नांव | शासकीय फॉर्म भरला आहे किंवा नांही | इ.१२ वी गुण | जात संवर्ग | प्रवेशाचा संवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

प्राचार्य (सही)
शिक्का

अध्यक्ष/सचिव,(सही)
शिक्का

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

---

## हमीपत्र
## (रु.१००/- स्टॅम्प पेपरवर)

### एन.सी.टी.ई. अधिनियम १९९३ मधील तरतूदीनुसार प्रवेशित विदयार्थ्यांचे २०० कार्यदिन पूर्ण केलेचे अध्यापक विदयालयाचे प्राचार्य यांचे हमीपत्र